Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

October-November-December-2018

Vol. 5 Issue 4

**Chief Editor :**

Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**This Journal is indexed in :**

- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261
UGC Approved Journal | October-November-December 2018 | Vol. 5, Issue 4

## Editorial Board

**Chief Editor -**

**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Co-Editors -**

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology. **Riyadh Kingdom of Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur [M.S.] India
- **Dr. G. S. Wankhede** - Baliram Patil Arts, Commerce & Science College, Kinwat-Nanded
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Prin. Dr. B. V. Game** - MGV's Arts and Commerce College, Yeola-Nashik [M.S.] India
- **Dr. Sharad Birhade** - D. N. College, Faizpur.
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon
- **Prof. Atul Suryawanshi** - S. S. M. M. College, Pachora.
- **Prof. B. P. Shewale** - M. S. G. College, Malegaon Camp, Nashik.
- **Prof. V. S. Bhalerao** - J. N. V. Kangda, [H.P.] India.

**Advisory Board -**

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. D. A. Suryawanshi** - Principal, R. C. Patel College of Education, Shirpur, **Dhule.**
- **Dr. Sandip D. Mundhe** - Head, Lib. Science, Sambhajirao Kendre College, **Jalkot, Latur**
- **Dr.Y. H. Saner** - Principal, Abhay College of Education, **Dhule**
- **Dr. D. D. Patil** - Principal, Arts, Science and Commerce College, Chopda, **Jalgaon**

**Review Committee -**

- **Dr. Leena Pandhare** - HoD. of English, MGV's Arts and Commerce College, Yeola-Nashik [M.S.] India
- **Dr. Uttam V. Nile** - P. S. G. V. P. Mandals Arts, Cmmerce, Science College, Shahada
- **Dr. Sanjay Dhondare** - Abhay Womens College, Dhule
- **Dr. Rekha Gajare** - Head, Dept. of Hindi, P.O.Nahata College, Bhusawal
- **Dr. Ramesh Sambhaji Kure** - Head, N. W. College, Akhala Balapura Dist-Hingoli
- **Dr. S. T. Khairnar,** - Member, BoS, Commerce (SPPU), L.V.H. College, Panchavati.

**Publisher:**

- **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, (Yeola) Nashik**

Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net **Mobile** : 9665398258



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 61 | आचार्य सत्यनारायण गोयंका के साहित्य में प्रतिबीम्बित भगवान बुद्ध का नारी विषयक दृष्टीकोन | अंजना सोनवणे | 268 |
| 62 | मावळ तालुक्यात विविध- सण उत्सवावेळी सादर केले जाणारे अभिनयसंपन्न लोकनाट्य:ललीत | डॉ. प्रकाश साळुंखे | 275 |
| 63 | कौटिलीय अर्थशास्त्र : पीक नियोजन व जल व्यवस्थापन | शिरीष अमृतकर | 279 |
| 64 | रेशीम उद्योगातून मिळणारे उत्पन्न आणि रोजगार | डॉ. शशांक पोळ व भाऊसाहेब दरेकर | 284 |
| 65 | कालिदासाच्या साहित्यातील मानवी सूक्ष्म भाव भावनांचे दर्शन | प्रा.श्रीमती बकुल कांबळे | 289 |
| 66 | भारतातील कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा आढावा | डॉ. कल्याण मोरे व प्रा.अरविंद पाटील | 299 |
| 67 | कृषी साहित्यातील समस्या | शिरीष अमृतकर | 303 |
| 68 | यावल तालुक्यातील उच्च माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक कार्यसमाधनाचा अभ्यास | डॉ.प्रतिभा सूर्यवंशी | 310 |
| 69 | पांडुरंग नथुजी राजभोज व मंदिर सत्याग्रह चळवळ विशेष अभ्यास : पर्वती मंदिर सत्याग्रह | डॉ.राजकुमार सुरवसे | 314 |
| 70 | प्रिया तेंडूलकर यांच्या कथेतील स्त्रीवादी विचारसरणी | डॉ.वैशाली झोडे | 317 |
| 71 | १९९० नंतरचे ग्रामीण जीवनाचे प्रश्न आणि सदानंद देशमुख यांचे कादंबरी लेखन | डॉ.माणिक बागले | 319 |
| 72 | प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भौगोलिक संकल्पनांच्या आकलनासाठी बुध्दीमंथन तंत्राच्या परिणामकारकतेचा अभ्यास | डॉ.वंदना चौधरी | 323 |
| 73 | लोकसाहित्यातील ओवीतून कुटुंब चित्रण | डॉ. स्वाती वाकोडे | 327 |
| 74 | भगवान बुद्धाचे वास्तववादी अर्थशास्त्र | डॉ.मनोजकुमार भोवते | 332 |
| 75 | शेतकरी वेदनेची गाथा:बारोमास | डॉ. मधुकर बैकरे | 335 |
| 76 | प्रा.मधू जामकरांच्या ललित लेखनातून काव्यात्मकता | डॉ.आर.बी.धायगुडे | 340 |
| 77 | गोविंदाग्रज ह्यांच्या गुढगुंजनात्मक कविता एक चिंतन | प्रा.अमृता डोरलीकर | 343 |
| 78 | भटक्यांच्या स्वकथनातून व्यक्त होणारा परिवर्तनाचा वेध | डॉ.ईश्वर सोमनाथे | 348 |
| 79 | मध्ययुगीन महाराष्ट्रातील संतमहिलांची वाटचाल एक विश्लेषण | स्वाती बदामे व डॉ.शिवाजी पवार | 351 |
| 80 | श्रीनिवास कुलकर्णी यांच्या ललीत लेखनातील प्रादेशिकता व निसर्गचिंतन | डॉ.राजाभाऊ धायगुडे | 355 |
| 81 | चंद्रकांत महामिने यांच्या विनोदी कथा संग्रहाचा अभ्यास | प्रा. मनीषा गुंडगळ (चव्हाण) | 359 |
| 82 | झाडीमंडळाचे साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक वाङ्मयीन चळवळीचे योगदान | डॉ.धनराज ल. खानोरकर | 365 |
| 83 | विनोबांचे राजकीय वर्गीकरण व लोकशाही विषयक विचार | डॉ. दीपक लोणकर | 370 |
| 84 | गुंतवळ | डॉ. अंजली मुकुंद पांडे | 374 |
| 85 | अमरावती विभागातील आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षकांच्या सर्जनशीलतेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर होणारा परिणाम – एक अभ्यास | विठ्ठल होनाळे, डॉ. मोहन खताळ | 377 |
| 86 | ग्रामीण साहित्य प्रेरणा | डॉ.गोवर्धन मुळक | 381 |
| 87 | वारी : ऐक्य जीवा-शिवाचे | डॉ. संतोष देशमुख | 386 |
| 88 | लोकसंस्कृतीचा प्रतिनिधी – वासुदेव व त्याची लोककथागीते | डॉ. रामकिशन दहिफळे | 390 |
| 89 | वारकरी संप्रदाय : समाजप्रबोधनाचे माध्यम | डॉ.अशोक लिंबेकर | 394 |
| 90 | पर्यटनाचा पर्यावरणावर होणारा परिणाम | प्रा. प्रकाश काळवणे | 397 |
| 91 | स्त्री-भ्रुणहत्या: परिणाम आणि उपाय | डॉ.साईनाथ बनसोडे | 400 |




Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
UGC Approved Journal | Impact Factor - (SJIF) - 6.261 | October-November-December 2018 | Vol. 5, Issue 4

# विनोबांचे राजकीय वर्गीकरण व लोकशाही विषयक विचार

डॉ. दीपक पां. लोणकर
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा
जि. चंद्रपूर (महा) मो.९९५७३३६९९४
Email- deepakmd.lonkar@gmail.com

## प्रस्तावना

आधुनिक भारताच्या इतिहासात जे काही राजकीय विचारवंत होऊन गेले त्यात विनोबांचे स्थान महत्वाचे मानले पाहिजे. त्यांच्यावर म. गांधींजीच्या विचारांचा व तत्वप्रणालीचा जरी प्रभाव असला तरी त्यांची काही स्वतंत्र अशी राजकीय मते होती. लोकशाहीतसुध्दा केंद्रीयस्थानी असलेली शासनसंस्था ही शक्तीशाली असते. या शक्तीशाली शासनसत्तेच्या छायेत व कक्षेत व्यक्तीमत्वाची वाढ खुंटते, तिचा योग्य तो विकास होत नाही म्हणून शासनसंस्थेचे कमीत कमी नियंत्रण हे व्यक्तिमत्वाच्या विकासाला पोषक आणि वर्धक ठरते. असे त्यांचे मत होते. विनोबा हे व्यक्तिस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते असले तरी अनियंत्रित व्यक्तिवादाचे व स्वैराचाराचे पुरस्कर्ते नव्हते. विनोबांना राजकारणाची विशेष आवड नव्हती. त्यामुळे ते कोणत्याही पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते झाले नाही. अगदी सुरूवातीच्या काळात गांधीजींच्या सांगण्यावरून कॉंग्रेसचे सदस्यत्व निश्चितपणे स्वीकारले होते परंतु नंतर त्यांनी राजीनामा दिला होता.[१] त्यानंतर मात्र त्यांनी समाजकारण करण्याचे ठरविले. पण त्यांची राजकीय विचारसरणी अतिशय दांडगी होती. राजकारणाचा निःपक्षपातीपणे अभ्यास करावा असे त्यांचे मत होते.

## उद्दीष्टये -

१) सरकार व जनता यांचे संबंध स्पष्ट करणे.
२) सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे महत्व जाणून घेणे.
३) राजकारणातून लोकविकासाचे महत्व समजावून सांगणे.

## लोकशाहीविषयक विचार -

विनोबांचे राजकीय विचार हे साम्ययोगावर आधारित होते. त्यांना आजची लोकशाही तेथील दोषांमुळे उपयोगाची वाटत नव्हती.[२] त्यामुळे त्यात अनेक सुधारणा त्यांना आवश्यक वाटतात. लोकशाहीतील विरोधी पक्ष हा सत्ताधारी पक्षावर नियंत्रण ठेवण्यास पुरेसा नाही. राजकीय पक्षातील लोक जनतेची कर्तृत्वशक्ती क्षीण करण्याचा प्रयत्न करताना आत्मविश्वास नष्ट करतात. राजकीय पार्टीमध्ये देशाच्या शक्तीचे तुकडे पडतात म्हणून पक्षापासून मुक्ती झाली पाहिजे हे सांगताना विनोबा म्हणतात की, ''सत्ताधारी पक्ष आपल्या चुका कबुल करीत नाही, आपल्या सरकारवर टिका करीत नाही त्यांच्या तोंडाला कुलूप लावलेले असत. विरोधी पक्षवालेही वाटेल तशी बडबड करतात..... एक पक्ष दुसऱ्याला तर दुसरा पक्ष पहिल्याला शिव्या देतो. त्याचा एकमेकांवर विश्वास नसतो त्यामुळे व्यवहारशुध्दी राहु शकत नाही.''[३] म्हणून पक्षनिष्ठा हया सत्यनिष्ठा झाल्या आहेत त्यामुळे पक्षभेद हा हानिक्रारक होतो.

पुढे विनोबा म्हणतात की, आजचे पक्ष हे लोकांचे मते मिळविण्यासाठी एकत्र येतात, प्रचार करायला सांगतात., परंतू आंतरिक कर्मावर जोर देत नाहीत. सभेत मोठमोठी आश्वासने देतात परंतू पूर्ण करित नाहीत याचे त्यांना वाईट वाटते. मतदानाची आजही प्रकिया ही त्यांना औपचारिक वाटत असून ते निवडणुकीला यंत्र मानतात.[४] म्हणून ते सांगतात की, आज ज्या पध्दतीने आपण भारतात निवडणुका घेतो ती पध्दत भारतीय

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261
UGC Approved Journal
October-November-December 2018
ISSN : 2348-7143
Vol. 5, Issue 4

प्रकृतीला मानवणारी नाही. निवडणुकीत परनिंदा, आत्मस्तुती आणि खोटा प्रचार इत्यादीवर राजकीय पक्षांचा जोर असतो. याशिवाय एवढया मोठया पैशांची बेसुमार उधळपट्टीही भारताला परवडण्यासारखी नाही म्हणून ते सुचवितात की, ''कोटयवधी रूपयांचा चुराडा करणारी ही पक्षीय राजकारणाची व निवडणुकीची पध्दत जी पश्चात्यांकडून घेतलेली आहे ती फार अनिष्ट आहे..''.[५] म्हणून ते इलेक्शन लढण्यापेक्षा खेळावे असे सुचविताना म्हणतात की, पक्षीय राजकारणात निवडणुकीत जातीय व्यवस्थेलां खतपाणी घातल्या जाते. त्यामुळे समाजाची हानी होऊन फुटीरवादी प्रवृत्ती वाढीस लागते. शिवाय निवडणुक झाल्यावर जनहितापेक्षा आपल्या पक्षाच्या लोकांच्या हिताकडे जास्त लक्ष दिले जाते. राजकीय पक्षाच्या सर्व हालचाली हया पक्षहीत समोर ठेऊन चालतात. पुढे विनोबा मतांची व्याख्या करताना म्हणतात की, ''मत म्हणजे मनात येईल ते नव्हे तर इंद्रियांचा पगडा बसू न देता स्वतंत्र वृत्तीने आपले मन जे सांगेल ते आपले स्वतंत्र मत होय.''[६] विनोबांना मत पेटीत टाकणे हे मतदानाचे नाटक वाटते. म्हणून त्यानी कधीच मतदान केले नाही. मतदानामुळे अपप्रवृत्तीला प्रोत्साहन मिळते, एका पक्षाला मत दिले तर दुसरा नाराज होतो. गावात त्यामुळे कायमचे शत्रुत्व निर्माण होते व गावातील हे शत्रुत्व नाहीसे करणे कठीण जाते.

विनोबांना आजची लोकशाही लोकराज्य वाटत नाही कारण लोकशाहीतील बहुमतांचा विचार त्यांना इथे दिसत नव्हता तर अल्पमताचेच राज्य व सत्तेचे केंद्रीकरण दिसून येते. म्हणून लोकशाही नोकरशाहीची गुलाम आहे. कामे लवकर होत नाहीत. सगळी सत्ता सरकारच्या हातात आहे. त्यामुळे कल्याणकारी कामे होत नाहीत म्हणून ते त्याल इल्फेअर (अकल्याणकारी) असे म्हणतात.[७] म्हणून त्यासाठी काही सूचनाही करताना सुधारणेची गरज प्रतिपादन करतात, निवडणूकीचे क्षेत्र मर्यादित करून मंत्री पक्षमुक्त करावेत, सर्वांना सामावून घेऊन सहमतीची प्रक्रिया राबवावी, विद्यार्थी व स्त्रियांना राजकारणापासून मुक्त ठेवावे.[८] अप्रत्यक्ष निवडणूक पध्दतीचा अवलंब करून उदात्त आदर्श ठेवावा. पक्षमुक्त समाज निर्माण करून काही कार्ये करावीत.[९] समाजात देशसेवा ही सत्तेद्वारे करण्याची पध्दत सुरू झाली असून सत्ता प्राप्त करणारे लोक त्याला सेवेचे नाव देतात. परंतु सेवा नावपुरती केली जाते. म्हणून सेवेमार्फत सत्तेचा शेवट झाला पाहिजे असे विनाबांना वाटते. राजकारणात पडण्यापेक्षा तटस्थ राहिले पाहिजे व सर्वांचीच सेवा केली पाहिजे. आजचे सरकार हे जोडणारे नाही तर तोडणारे आहे म्हणून सरकार हातात नको तर आज्ञेत हवे अशी विनोबांची ठाम समजूत होती.[१०]

विनोबांना 'राजनीती' हा शब्द योग्य वाटत नव्हता म्हणून त्यांनी राजनीतीच्या ऐवजी 'लोकनीती' हा शब्द वापरावा असे सांगीतले. लोकनीतीचा अर्थ सांगताना विनोबा म्हणतात की, ''सत्ता क्रमाक्रमाने लोकांच्या हाती आली पाहिजे. सरकार नेहमी दृष्टिआड राहून त्या जागी लोकव्यवस्थेचा विकास व्हावा, कर्तृत्वाचा लगाम लोकांच्या हाती यावा आणि मग लोकांनी आपल्या उपयोगाची इच्छा आणि शक्ती प्रकट करावी''[११] या लोकनीतीत सगळी सत्ता ही गावागावांत असून लोकांच्या हाती असावी, यात राजनीतीचेच दोष दाखवायचे नाही तर राजनैतिक चिंतनही करावयाचे आहे. याशिवाय रचनात्मक कामाच्या माध्यमातून अहिंसक क्रांती आणणे, आजच्या निवडणुकीवर बहिष्कार घालणे व विरोध करणे, सरकारचे उच्चाटन करणे, परंतु सहकार्याच्या माध्यमातून सज्जनांचा राजनीतीत सहभाग घेणे इत्यादी माध्यमातून लोकनीती स्थापन करावी असा विनोबांचा आग्रह होता. यासाठी लोकशक्ती उभी करण्याची आवश्यकता त्यांना वाटते. जी लोकशक्ती हिंसाशक्तीच्या विरोधी असेल व दंडशक्तीहून भिन्न असेल.[१२]

**राजकीय वर्गीकरण -**

विनोबा राज्य व स्वराज्य या दोन गोष्टी वेगवेगळया मानतात, ते म्हणतात की, राज्य हे हिंसेने मिळविल्या जाऊ शकते परंतु स्वराज्य मिळविण्यासाठी अहिंसेची आवश्यकता आहे... पुढे स्वराज्याची व्याख्या करताना,

ISSN : 2348-7143
Vol. 5, Issue 4

''स्वराज्य म्हणजे अशा प्रत्येक व्यक्तीचे राज्य जे प्रत्येकाला आपले वाटेल, एका अर्थाने रामराज्य''[१३] असे म्हणतात. त्यांनी राज्यव्यवस्था ही नैसर्गिक स्वरूपाची मानून तिचे तीन प्रकार सांगीतले.

१. एकायतन पध्दती - या पध्दतीत कोणत्याही एका व्यक्तीच्या हाती राजकीय व्यवस्थेची सूत्रे असतात.
२. बहुयतन पध्दती - या पध्दतीत अनेक लोकांच्या हाती राजकीय सूत्रे असतात.
३. सर्वायतन पध्दती - या पध्दतीत सर्व मिळून समान जबाबदारी आपली राजकीय व्यवस्था पाहतात, कोणीही कोणाचा द्वेष, मत्सर करीत नाहीत, सर्व व्यक्ती समाधानी असतात.

विनोबांच्या मते - ''एकायत आणि सर्वायतन हे दोन्ही प्रकार अगदी एकटोकी आहेत. परंतु अनेकायतन (बहुयतन) पध्दती दुसऱ्या अनेक पध्दतींना जन्म देते...''[१४] असे सांगून त्यांनी या पध्दतीचे आणखी दोन प्रकारही सांगीतले - १) अल्पसंख्यायतन २) बहुसंख्यायतन. पुढे विनोबांनी अल्पसंख्यायतन पध्दतीने आणखी तीन पोटविभाग पाडले - अ) एक दल ब) द्विदल क) त्रिदल.

अशाप्रकारे पुढे वरील तीन प्रकारांचे पुन्हा अनुक्रमे तीन, सहा, नऊ असे एकूण १८ प्रकार[१५] पाडताना विनोबा म्हणतात की, ''एकायतन पध्दती आज जवळपास नाहिशी झाली आहे तर सर्वायतन पध्दती अजून कोठेही उत्पन्न झाली नाही तरी अनेकायतन पध्दती आज निरनिराळया प्रकारात जगात उपलब्ध आहे असे सांगून पुढे ते म्हणतात की, आजच्या घटकेला जगात जी सरकारे आहेत ती यापैकी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात बसतात. सर्वायतन पध्दती मात्र कोठेच नाही...[१६] लोकशाहीचे नाव धारण करून सर्वायतन पध्दतीचा भास भारत, अमेरिका व युरोप खंडातील राष्ट्रात होतो असे त्यांना वाटते म्हणून ते म्हणतात की, ''हिंसेवर आधारलेली कोणतीही पध्दती जरी डोक्यागणिक मतमोजणीचे सोंग करीत असले तरी ती सर्वायतन नाही...[१७] परंतु लोकांनी जर स्वच्छने बुध्दिपूर्वक आपल्यातील राग द्वेषरहीत, बुध्दिमान व कुशल असलेल्या एका व्यक्तीच्या किंवा अनेक व्यक्तींच्या हाती सत्ता सोपविली आणि ती वरवर एकायतन किंवा अनेकायतन दिसत असली तरी अहिंसेवर आधारलेली असेल तिला सर्वायतन म्हटले तर वावगे नव्हे असे विनोबांना वाटते. तर बहुसंख्यायतन पध्दतीचा प्रयोग आंधळया आवेशाने रशियात सुरू आहे. म्हणून हिंसा ही केव्हाही आणि कोठेही बहुजन समाजाचे हत्यार होऊ शकत नाही. त्यामुळे रशियातील प्रयोग हा वस्तुतः शस्त्रास्त्र धनिक या पध्दतीत मोडतो.[१८] तेव्हा विनोबांना या पध्दतीवरून असे आढळून येते की, सर्वायतन पध्दती ही महत्तम लाभकारी आहे. ती कोणत्याच राष्ट्रात नाही. अशावेळी ते म्हणतात की, ''आपण अशा प्रणालीचा शोध घेतला पाहिजे, ज्या शासनपध्दतीत सर्वांचे प्रतिनिधित्व असावे व प्रत्येक कार्य हे सर्वसंमतीने केले जावे.[१९]

विनोबांना राज्यपध्दती आदर्श असावी असे वाटते. यासाठी सर्व राष्ट्रीय भातृभाव, सर्वांचे हार्दिक सहकार्य, अल्प व बहुसंख्याकांचे हितैक्य, सर्वांचा सर्वांगीण विकास, राजसत्तेचे विभाजन, अल्पमतशासन, सुलभमत तंत्र, कमीतकमी खर्च, सार्वत्रिक व मुक्त ज्ञानाचा व्यापार इत्यादी गोष्टींची आवश्यकताही ते प्रतिपादन करतात.[२०] तर निर्दोष राज्यपध्दतीसाठी ते खालील उपाय सुचवितात.

१) समर्थाचे सामर्थ्य जनसेवेला वाहिले असले पाहिजे.
२) जनता संपूर्ण स्वावलंबी व परस्पर सहकारी असली पाहिजे.
३) नेहमीच्या सहकार्याचे आणि प्रासंगिक असहकाराचे अथवा प्रतिकाराचे अहिंसा हेच अधिष्ठान असले पाहिजे.
४) सर्वांच्या प्रामाणिक परिश्रमाची किंमत (नैतिक व.आर्थिक) समान असली पाहिजे.[२१]

मुल्यमापन -

विनोबा हे एक राजकीय विचारवंत होते. त्यांची स्वतःची स्वतंत्र अशी मते होती. त्यांना लोकशाही शासन योग्य वाटत नव्हते. या शासनात गरीब, दिनदुबळयांचा विचार होत नाही, सरकारही श्रीमंताकडे लक्ष देते त्यामुळे

ISSN : 2348-7143
Vol. 5, Issue 4

स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे लोटल्यानंतरही गरिबांचा उध्दार झाला नाही याची त्यांना खंत होती. विनोबांनी आधुनिक निवडणूक पध्दतीवरही टिका केली होती. यामध्ये पैशाचा अपव्यय होतो. हाच पैसा जनतेच्या कल्याणासाठी जर उपयोगात आणला तर जनतेचे भले होईल असे त्यांचे मत होते. तसेच आधुनिक पक्षपध्दतीवर त्यांचा अविश्वास असून पक्षीय राजकारणामुळे समाजात फुटीरतावादी प्रवृत्ती वाढते असे त्यांना वाटत होते. त्यांनी राज्यव्यवस्थेचे वर्गीकरण करून तीन पध्दती सांगीतल्या आहेत. एकूणच त्यांनी केलेले हे वर्गीकरण नक्कीच एका श्रेष्ठ राज्यशास्त्रज्ञाच्या तोडीचे आहे असे म्हणणे योग्य होईल. विद्यार्थ्यांनी राजकारणापूसन दूर राहावे असे त्यांचे मत होते. विनोबा व्यक्तिस्वातंत्र्याला महत्व देतात परंतु ते स्वैराचारी व्यक्तिवाचे पुरस्कर्ते नव्हते. मार्क्सप्रमाणे राज्यविहीन समाजव्यवस्थेची कल्पना त्यांचीही असली तरी दोन्ही कल्पनेत मुलभूत स्वरूपाचा फरक होता. मार्क्सला सशस्त्र क्रांतीनंतर मजूरांची सत्ता अपेक्षित होती तर विनोबांना हृदयपरिवर्तन व नितीनियम यांच्या माध्यमातून होणारा चिरस्थायी बदल अपेक्षित होता. एखादया प्रश्नासंदर्भात सरकारने त्यांना सांगावे आणि सरकारी काम समजून ते निवारणार्थ मध्यस्थी करावी असा दंडकच विनोबांनी घातलेला दिसतो. उदा. शांतियात्रा, आसामचा भाषाप्रश्न, हैदराबादचा प्रश्न इत्यादीवरून हे लक्षात येते. यामुळे विनोबा हे अघोषित 'सरकारी राजदूत' ठरतात.

## संदर्भग्रंथ सूची

१. विनोबा 'प्रेमपंथ अहिंसेचा' पंरधाम प्रकाशन, पवनार, २००३ पृष्ठ ८६
२. विनोबा, 'विनोबा साहित्य खंड १६', परंधाम प्रकाशन, पवनार, १९९६, पृष्ठ ६५.
३. विनोबा, 'लोकनीती' परंधाम प्रकाशन, पवनार, २००४ पृष्ठ ४२.
४. कित्ता, पृ. ४४.
५. विनोबा, 'भूदानगंगा खंड ३', परंधाम प्रकाशन, पवनार, १९८५. पृष्ठ १३.
६. विनोबा, 'चुनाव', अखिल भारतीय सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी, १९५७, पृष्ठ १६.
७. विनोबा, 'मधुकर', परंधाम प्रकाशन, पवनार, २००६. पृष्ठ. ५६.
८. विनोबा, 'लोकनीती', पृ. ६६.
९. विनोबा, 'वि.सा.खं. १६', पृ. १३२.
१०. विनोबा, 'लोकनीती' पृ. ७८.
११. कित्ता, पृ. ६२.
१२. विनोबा, 'लोकनीती', पृ. ८८.
१३. विनोबा, 'वि.सा.खं. १६', पृ. १८.
१४. विनोबा, 'सर्वोदय विचार आणि स्वराज्यशास्त्र', परंधाम प्रकाशन, पवनार, १९९६, पृष्ठ. १६२.
१५. विनोबा, 'वि.सा.खं. १६', पृ. २२.
१६. विनोबा, 'स.वि.आ.स्व.', पृ. १६४.
१७. कित्ता, पृ. ८.
१८. विनोबा, 'स.वि.आ.स्व.', पृ. ६.
१९. सर्वोदय साधना (साप्ताहिक), ऑगस्ट १२, १९७४, पृष्ठ. ८.
२०. विनोबा, 'स.वि.आ.स्व.', पृ. १७.
२१. कित्ता, पृ. २२.